# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं. १७/२०१८

| | | |
|---|---|---|
| श्री. रामचंद्र किसन जाधव<br>रा.२९५-२९६,रविवार पेठ,उमाजी नाईक चौक,<br>माणिकवाडी फलटण जि.सातारा | } | तक्रारदार |

विरूध्द्

| | | |
|---|---|---|
| १. फलटण एज्युकेशन सोसायटी, फलटण,<br>जि.सातारा<br>२. श्रीमंत भैय्यासाहेब राजेमाने महाविद्यालय, म्हसवड,<br>ता.माण.जि.सातारा | } | वि. प |

फलटण एज्युकेशन सोसायटी. फलटण, जि.सातारा या शिक्षण संस्थेचे श्रीमंत भैय्यासाहेब राजेमाने महाविद्यालय, म्हसवड, ता.माण, जि.सातारा यांचेकडील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. रामचंद्र किसन जाधव यांनी दि.१८/०२/२०१६ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

सेवाजेष्ठता डावलून व आरक्षण डावलून पुढीलप्रमाणे अन्यायकारक बढत्या दिलेबाबत

१.श्री.नामदेव रामचंद्र भांडवलकर यांना माझे नंतर नियुक्ती व माझे नंतर वरिष्ठ लिपिक पदी बढती दिली असताना तक्रारदार यांची सेवाजेष्ठता डावलून मुख्य लिपिकपदी बढती दिलेली आहे. या कर्मचा-यांवर तक्रार निवारण समितीने वरिष्ठ लिपिकपदावर बढतीबाबत कार्यवाही केली आहे.

२.श्री.कुमरे दिलीप नारायण या कर्मचा-यांचे अनुजातीतील कनिष्ठ लिपिक हे पद मान्यता न घेता बढती दिल्यामुळे विभागीय सहसंचालक कार्यालयाने कनिष्ठ लिपिक पदाची वेतन निश्चिती अडवली असतानाही त्यांना वरिष्ठ लिपिक पदी बढती दिलेली आहे.

३.कुमारी तांबोळी एफ.जे. यांचे प्रमोशन या अगोदरच्या भरतीमध्ये एक ओबीसी महिला कनिष्ठ लिपिक पदी भरती केली असतानाही त्यांना ओबीसी मधून इतर सेवाजेष्ठ कर्मचा-यांना डावलून कनिष्ठ लिपिक पदी बढती दिलेली आहे.

४.नियमित वेतन, नियमबाहय दिली, २४ वर्षानंतरची कालबध्द् पदोन्नती पासून वंचित, बदली व मुख्य लिपिक पदावर बढतीपासून वंचित असलेबाबत थकीत वेतनापासून वंचित असलेबाबत

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. २४ वर्षानंतरची कालबध्द् पदोन्नतीचा प्रस्ताव श्री.जाधव यांनी महाविद्यालयाकडे सादर केलेला नाही.

२. एमएससीआयटी या प्रशिक्षणाचे फक्त प्रमाणपत्र आहे. संगणकावरील कोणतेही कामकाज पत्रव्यवहार करता येत नाही. विद्यापीठीय पत्रांची उत्तरे तयार करता येत नाहीत.

३. दि.०८.०२.२०१६ च्या श्री.जाधव यांनी दिलेल्या पत्रानुसार महाविद्यालयीन कीर्द, खतावणी लिहीता येण्यास असमर्थ व अकार्यक्षम आहेत.

४. मराठी, इंग्रजी टायपिंग झालेले नाही. त्यामुळे कार्यालयीन कामकाजात अज्ञानी आहेत.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार श्री.रामचंद्र किसन जाधव पुकारता गैरहजर. संस्थेतर्फे खजिनदार श्री.एच.व्ही.रानडे व प्राचार्य डॉ.कदम संतोष तुकाराम हजर. समितीतर्फे काढणेत आलेली नोटीस तक्रारदारावर बजावलेली असून त्यानां तोडी सुचना देखील देण्यात आलेली आहे. असे असून सुद्धा तक्रारदार गैरहजर आहेत. तक्रार अर्जाचे अवलोकन करता तक्रार अर्जात मागितलेल्या मागण्या तसेच तक्रारदारने दाखल केलेली मा. उच्च न्यायालया समोरील याचिका क्रं. १०८५०/२०१६ व मा.पिठासन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण पुणे, यांच्या समोरील अपील क्रं. १/२०१७ हया अपीलातील मागण्यांचा विचार करता या तिन्ही प्रकरणातील मागणी एकच असलेचे दिसून येते. या तिन्ही मागण्या एक असल्याबददल कोणतेही स्पष्टीकरण तक्रारदाराने दिलेले नाही. तक्रारदार गैरहजर असलेने या तिन्ही दार्दीपैकी कोणती दाद त्यास चालू ठेवायची आहे, याबददलचा पर्याय त्यांच्याकडून घेता येत नाही. जेंव्हा या प्रकरणातील मागणी वरिष्ठ न्यायालयासमोर प्रलंबीत आहे असे दिसून येते. त्यावेळी या समितीला हे प्रकरण पुढे कायद्याने चालविता येत नाही. सबब प्रकरण खारीज करण्यात येत आहे.

वरिष्ठ न्यायालयासमोर प्रलंबीत आहे असे दिसून येते. त्यावेळी या समितीला हे प्रकरण पुढे कायद्याने चालविता येत नाही. सबब प्रकरण खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

तक्रार खारीज करण्यात येत आहे.

दिनांक : 27 SEP 2023

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोळेकर )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)